आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१ मे  २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- नवा, समृद्ध आणि सशक्त महाराष्ट्र घडविण्यासाठी नागरिकांनी एकत्र यावं असं राज्यपालांचं महाराष्ट्रदिनानिमित्त आवाहन

- लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी गुजरातच्या दौऱ्यावर

- पाचव्या टप्प्यातल्या लढतींसाठी काँग्रेसची आणखी एक यादी जाहीर शिवसेनेचे ३ उमेदवार जाहीर

- व्यावसायिक वापराच्या गॅसच्या  दरात प्रति सिलेंडर १९ रुपये कपात
- बॅडमिंटनच्या कनिष्ठ गट जागतिक अजिंक्यपद स्पर्धांचं 2025 या वर्षीचं यजमानपद भारताकडे

**आणि**

- देशात उष्णतेच्या लाटेचा कहर

**<><><><><>**

महाराष्ट्र आणि गुजरात ही राज्य आज पासष्ठावा स्थापनादिन साजरा करीत आहेत.

पासष्ठाव्या महाराष्ट्र दिनाचा राज्याचा मुख्य शासकीय सोहळा मुंबईत शिवाजी पार्क इथं झाला. यावेळी राज्यपालांच्या हस्ते ध्वजारोहण झालं, यावेळी राज्यपालांनी विविध दलांच्या संचनालाची पाहणी करून मानवंदना

स्विकारली. या संचलनात बृहन्मुंबई पोलीस विभागाची ४ महिला निर्भया पथकं आणि मुंबई अग्निशमन दलाची अत्याधुनिक वाहनं सहभागी झाली होती. नवा, समृद्ध आणि सशक्त महाराष्ट्र घडविण्यासाठी नागरिकांनी एकत्र यावं असं आवाहन राज्यपालांनी राज्यातल्या जनतेला उद्देशून केलेल्या संबोधनात केलं. महाराष्ट्राच्या विविधतेतून भारताचं दर्शन होतं, इथली भौगोलिक स्थिती औद्योगिक विकासासाठी अनुकूल असल्याचं सांगून कृषी आणि औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र अग्रेसर असल्याचं त्यांनी अधोरेखीत केलं. कामगार दिनानिमित्त महाराष्ट्र तसंच देशाच्या जडणघडणीत अमूल्य योगदान देणाऱ्या सर्व कामगारांनाही त्यांनी शुभेच्छा दिल्या.

सध्या सुरु असलेल्या लोकसभा निवडणूकीत नागरिकांनी मताधिकार बजावण्याचं आवाहनही राज्यपालांनी यावेळी केली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, विविध देशांचे वाणिज्यदूत, सशस्त्र दलांचे वरिष्ठ अधिकारी यांच्यासह अनेक मान्यवर या सोहळ्याला उपस्थित होते. हुतात्मा चौकात महाराष्ट्र दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री शिंदे म्हणाले….

**होल्ड - बाईट- मुख्यमंत्री**

महाराष्ट्र दिनानिमित्त राज्यभरातली सर्व शासकीय - निमशाससकीय आस्थापनं, स्थानिक स्वराज्य संस्थांची मुख्यालयं आणि शाळा

महाविद्यालयांमध्ये ध्वजारोहणाच्या कार्यक्रमांचं आयोजन केलं गेलं, आणि मानवंदना दिली गेली.

गुजरात मधेही ६५वा स्थापना दिवस विविध कार्यक्रमांनी साजरा होतो आहे.

**<><><><><>**

जगाच्या आर्थिक उन्नतीत कामगारांच्या सहभागाचा गौरव म्हणून आजचा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून साजरा होत आहे. आर्थिक उन्नती आणि सामाजिक हक्कांच्या लढाईतील कामगारांच्या त्यागाचं स्मरण म्हणून आज जगभरात विविध कार्यक्रम, संचलनं होत आहेत. आजच्याच दिवशी १९८६ साली अमेरिकेतल्या शिकागो इथं कामगारांनी निदर्शनं **केली** होती यावेळी जमाव हाताबाहेर गेल्यानं अनेक जण जखमी झाले होते. हा प्रसंग पुढे हे मार्केट प्रकरण म्हणून जगभरात प्रसिद्ध झाला. १९८९ मध्ये युरोपातल्या अनेक सामाजिक संघटनांनी एकत्र येऊन १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला होता. तेंव्हापासून १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून साजरा होत असतो.

**<><><><><>**

भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी गुजरातमध्ये आज आणि उद्या मिळून सहा प्रचारसभा घेणार आहेत. साबरकांठा जिल्ह्यात हिम्मतनगर तसंच बनासकांठा जिल्ह्यात वाव इथं त्यांची सभा होईल. उद्या ते आणंद, सुरेंद्रनगर, जुनागड आणि जामनगर इथं सभा घेणार आहेत.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं आणखी चार उमेदवारांची यादी काल जाहीर केली. महाराष्ट्रात मुंबई उत्तर मतदारसंघातून भूषण पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. अभिनयाकडून राजकारणाकडे वळलेले राज बब्बर यांना हरियानातील गुरगाव मतदारसंघातून, माजी केंद्री मंत्री आनंद शर्मा यांना हिमाचल प्रदेशातल्या कांगरा मतदारसंघातून आणि सत्पाल रायजादा यांना हिमाचल प्रदेशातील हमिरपूर मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे.

महाराष्ट्रात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेनं तीन उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. नाशिक मधे विद्यमान खासदार हेमंत गोडसे आणि कल्याण मतदारसंघात विद्यमान खासदार श्रीकांत शिंदे यांना पुन्हा संधी दिली आहे. तर ठाणे मतदारसंघात नरेश म्हस्के यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

**<><><><><>**

एप्रिल २०२४ मध्ये २ लाख १० हजार कोटी रुपये इतकं वस्तू आणि सेवा कराचं सकल महसुली संकलन झाल्याची माहिती केंद्रीय अर्थमंत्रालयानं दिली आहे. हे आत्तापर्यंतचं विक्रमी संकलन असून, संकलनात वार्षिक १२ पूर्णांक ४ शतांश टक्क्याची वाढ झाली असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे. देशांतर्गत व्यवहार आणि आयातीमध्ये वाढ झाल्यानं वस्तू आणि सेवाकराचं संकलन वाढलं असं मंत्रालयानं म्हटले आहे.

एप्रिलमधल्या एकूण संकलनात केंद्रीय वस्तू आणि सेवाकराचा वाटा ४३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त, राज्यस्तरीय कराचा वाटा ५३ हजार कोटी रुपये, तर आंतराष्ट्रीय व्यवहारांतर्गच्या कराचा वाटा ९९ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे, तर अधिभारापोटी १३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे अशी माहिती मंत्रालयानं दिली आहे.

वस्तू आणि सेवाकरापोटीचा परतावा दिल्यानंतर एप्रिल २०२४ मधलं निव्वळ महसूली संकलन एक लाख ९२ हजार कोटी रुपये आहे, आणि गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत त्यात १७ टक्क्यांची वाढ झाली असल्याची माहितीही अर्थमंत्रालयानं दिली आहे.

**<><><><><>**

तेल उत्पादक कंपन्यांनी व्यावसायिक वापराच्या एलपीजीच्या किंमतीत १९ रुपये प्रति सिलेंडर कपात केली आहे. मुंबईत आता १९ किलो वजनाच्या सिलेंडरची किंमत १ हजार ६९८ रुपये पाच पैसे होणार आहे. घरगुती वापराच्या सिलेंडरच्या किंमतीत मात्र कोणताही बदल करण्यात आलेला नाही. इंडियन ऑईलच्या संकेतस्थळावर ही माहिती देण्यात आली आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज संध्याकाळी अयोध्येला जाणार आहेत. राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानंतर त्या पहिल्यांदाच अयोध्येला जाणार आहेत. त्या हनुमान गढीला जाऊन शरयू आरतीलाही उपस्थित राहतील.

राष्ट्रपतींच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर अयोध्येकडे जाणाऱ्या वाहतुकीत बदल करण्यात आला आहे.

<><><><>

आयपीएल टिट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज चेन्नई सुपर किंग्ज आणि पंजाब किंग्ज यांच्यात सामना होणार आहे. चेन्नईतल्या एम.ए. चिदंबरम स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

दरम्यान स्पर्धेत काल झालेल्या सामन्यात लखनऊ सूपर जाएंट्सनं मुंबई इंडिअन्सचा चार गडी आणि चार चेंडू राखून पराभव केला. दहा सामन्यांमधला मुंबईचा हा सातवा पराभव ठरला.

<><><><>

आकाशवाणीच्या महासंचालक या नात्याने भारतीय माहिती सेवेतल्या वरिष्ठ अधिकारी मौशुमी चक्रवर्ती यांनी आज पदभार स्वीकारला. माजी महासंचालक वसुधा गुप्ता काल सेवानिवृत्त झाल्या.

<><><><>

आकाशवाणी पुणे केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागाचं सुवर्ण महोत्सवी वर्ष आजपासून सुरू होत आहे. 1 मे 1975 रोजी आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन पहिल्यांदा प्रादेशिक बातमीपत्र प्रसारित झालं होतं.

<><><><>

बॅडमिंटनच्या कनिष्ठ गटासाठीच्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धांचं 2025 या वर्षीचं यजमानपद भारताला मिळालं आहे. जागतिक बॅडमिंटन

संघटनेच्या वतीनं घेण्यात येणाऱ्या या स्पर्धा गुवाहाटीमध्ये होणार आहेत. भारतातील युवावर्गाकडे उत्तम बॅडमिंटनपटू होण्याची क्षमता असून बॅडमिंटनमध्ये आपलं कौशल्य दाखवू शकतील अशी गुणवत्ता असणारे खेळाडू भारतात तयार होऊ शकतील, असं मत जागतिक बॅडमिंटन संघटनेचे अध्यक्ष पॉल एरिक होयर यांनी व्यक्त केलं आहे. स्पर्धांच्या तारखा अजून जाहीर झाल्या नसल्या तरी या निमित्तानं जागतिक दर्जाच्या युवा बॅडमिंटनपटूंचा खेळ बघण्याची संधी भारतीय क्रीडा रसिकांना पुण्यात 2008 मध्ये झालेल्या स्पर्धांनंतर प्रथमच मिळणार आहे.

**<><><><><>**

थॉमस चषक बॅडमिंटन स्पर्धेत भारताची गाठ उपान्त्यपूर्व फेरीत थायलंडशी पडणार आहे. चीनमधे चेंगडू इथं या स्पर्धा सुरु असून भारतीय प्रमाण वेळेनुसार संध्याकाळी ५ वाजता सामने सुरु होतील. आजच्या सामन्यावर क गटाचं अव्वल स्थान कोणाला मिळेल, ते अवलंबून आहे.

**<><><><><>**

देशाच्या अनेक भागात उष्णतेची लाट आली असून पश्चिम बंगाल, ओदीशा, बिहार आणि झारखंड राज्यांमध्ये हवामान शास्त्र विभागानं रेड अलर्ट दिला आहे. देशाच्या तेलंगण, कर्नाटक, आंध्र प्रदेश, केरळ, तामिळनाडू आणि पुद्दूचेरीमध्येही उष्ण आणि दमट हवामानासह पुढचे 4 दिवस उष्णतेची लाट कायम राहण्याचा अंदाजही हवामान विभागानं वर्तवला आहे. तेलंगणात अनेक ठिकाणी पारा 46 अंशांच्या वर गेला आहे. ईशान्य

भारतात मात्र कमाल तापमानात 2 ते 3 अंशांची घट होण्याचा अंदाज आहे. या भागात येत्या 4 दिवसांत तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या सरी पडण्याचा अंदाजही हवामान विभागानं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**